# निवेदन

**कोषागार कार्यालयात सादर केलेल्या देयकांची स्थिती दर्शविणाऱ्या सुविधेचा लाभ घेण्याबाबत**

राज्यातील जिल्हा कोषागार कार्यालयात अथवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून सादर केलेल्या देयकांची सद्यस्थिती इंटरनेटव्दारे **'कोषवाहिनी'** या संकेतस्थळावर **'Track Your Bill'** या मेनूमधून पाहता येऊ शकेल (यासाठी देयक कोणत्या कोषागारात सादर केले आहे त्याचा जिल्हा निवडून कोषागाराचा देयक क्रमांक अथवा देयक प्राधिकार पत्र क्रमांक (BDS Slip no) संकेतस्थळावरील रकान्यात भरावा). ही माहिती पाहण्यासाठी कोणताही पासवर्ड असण्याची आवश्यकता नाही.

१) सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

२) तसेच जिल्हा मुख्यालयातील विविध शासकीय कार्यालयांना ज्या कंत्राटदार/ पुरवठादारांनी त्यांची देयके सादर केली असतील ते पण त्या संबंधीत कार्यालयाकडून उपरोक्त नमुद देयक क्रमांक अथवा देयक प्राधिकार पत्र क्रमांक (BDS Slip no) प्राप्त करून घेऊन त्यांच्या देयकाची सद्यस्थिती या सुविधेव्दारे माहित करून घेऊ शकतात.

संकेतस्थळाचा पत्ता : www.koshwahini.mahakosh.gov.in असा आहे.

संचालक,
लेखा व कोषागारे, मुंबई.